Monday, March 16, 2015
3:12 PM

# जुन्नर पतसंस्थेने 'विशाल' कार्य करावे!

## –आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल : सहकार क्षेत्रात नियमबद्ध काम करून विश्‍वासार्हता मिळविलेल्या विशाल जुन्नर नागरी सहकारी पतसंस्थेने केवळ सहकार हाच उद्देश नजरेसमोर न ठेवता सामाजिक जाणिवेतून शिक्षण व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. संस्थेच्या या सेवाभावी कार्याचा लाभ पनवेल शहराला व्हावा, अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

विशाल जुन्नर नागरी सहकारी पतसंस्थेच्या २८व्या शाखेचे उद्‌घाटन रविवारी (दि. १५) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पनवेल येथे झाले. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय गोसावी होते. कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, पनवेलच्या नगराध्यक्षा चारुशीला घरत, गटनेते अनिल भगत, ज्येष्ठ नगरसेवक जयंत पगडे, माजी सभापती राजू सोनी, नगरसेविका कल्पना ठाकूर, सिटीझन युनिटी फोरमचे अरुण भिसे, नगरसेवक शिवदास कांबळे, संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन बांगर, विष्णू सोनावणे, नंदकुमार पाडेकर, भरत शेळके, विशाल जुन्नर प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभाष पाडेकर, ज्येष्ठ सभासद सुभाषशेठ शिंदे, शिवाजी कोकणे, जयसिंग चौरे, सुभाष काकडे, सचिव राजेंद्र हाडवळे, अनिल वऱ्हाडी, मंगेश गाढवे, महाव्यवस्थापक किसन खांडगे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, ३६ वर्षांपासून सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या विशाल जुन्नर पतसंस्थेच्या २८व्या शाखेचे आज उद्‌घाटन होत आहे. या संस्थेने गेल्या ३६ वर्षांत विश्‍वासार्ह कारभार करून जनतेच्या हृदयात स्थान मिळविले आहे. केवळ सहकार क्षेत्रात यशस्वी व उल्लेखनीय काम न करता सामाजिक क्षेत्रात उतरून शिक्षण व सेवाभावी कार्यही केले आहे. संस्थेने खऱ्या अर्थाने सहकारातून समृद्धीचा मंत्र जपला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी निरलसपणे केलेल्या विश्‍वासार्ह सेवेमुळे गेल्या ३६ वर्षांत संस्थेवर निवडणुका घेण्याची वेळ आली नाही. ही कौतुकाची बाब आहे.

या वेळी बोलताना बाळासाहेब पाटील म्हणाले की, सहकारी संस्था काढणे सोपे आहे, पण चालविणे अतिशय कठीण आहे. सहकाराचे नियम पाळून जनतेचा विश्‍वास संपादन करण्याची मोठी जबाबदारी पदाधिकाऱ्यांवर असते. विशाल जुन्नर पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ती यशस्वीपणे सांभाळली आहे. पारदर्शक कारभारामुळे गेल्या ३६ वर्षांत संस्थेवर निवडणूक घेण्याची वेळ आली नाही हे त्याचेच निदर्शक आहे. सहकारात भ्रष्टाचार आणि कर्ज बुडविण्याचे प्रमाण मोठे आहे, परंतु विशाल जुन्नर पतसंस्थेत अशी कोणतीही अनियमितता आढळून येत नाही. संस्था भविष्यात अशीच उत्तरोत्तर प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल, असा विश्‍वासही त्यांनी या वेळी व्यक्त केला.

संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन बांगर यांनी प्रास्ताविक भाषण करून संस्थेच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. संस्थेचे अध्यक्ष संजय गोसावी म्हणाले की, सहकारातील आदर्श आचरणप्रणाली घेऊन काम करणाऱ्या विशाल जुन्नर पतसंस्थेने यशाच्या मार्गातील उच्चतम उद्दिष्टे प्राप्त केली आहेत. आगामी काळात संस्थेचे एक हजार कोटी रुपयांचा व्यवसाय करण्याचे उद्दिष्ट आहे.त्यासाठी संस्था प्रयत्न करीत असून, सामाजिक जाणीव ठेवून समाजासाठी मार्गदर्शक ठरणारे काम करीत आहे. सभासदांच्या विश्‍वासाला पात्र बनताना संस्थेने यशाचा प्रत्येक टप्पा गाठला आहे. भविष्यातही पारदर्शक व सेवाभावी वृत्तीने कार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिवाजी कोकणे यांनी आभार मानले.